MHKO100006412024

<u>आदेश निशाणी क्र. २१</u>

प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत व विना म्हणणे” आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचा अर्ज व वादी यांनी दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे व त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे. शेतीच्या कामात व्यग्र असल्यामुळे दाव्यासंबंधी आवश्यक असलेली कागदपत्रे महसूल कार्यालयाकडून वेळेत उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे माहिती वकिलांना देता आली. कैफियत व म्हणणे दाखल करण्यास परवानगी न मिळाल्यास प्रतिवादी यांच्या नैसर्गिक न्याय हक्कावर गदा येणार आहे. प्रतिवादी यांनी कैफीयत व म्हणणे देण्यास जाणून बुजून टाळाटाळ केलेली नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे त्याच अर्जावर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जात नमुद केलेली कारणे संयुक्तीक नाहीत. अर्जात नमुद कथनांबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही.

प्रतिवादी यांनी जाणुनबजुन कैफियत व म्हणणे देण्यास टाळाटाळ केली आहे. सबब प्रतिवादी यांच्यावर रू. १०००/- कॉस्ट बसवण्यात यावी.

**५.** वादी यांनी सदरचा दावा मनाईकरीता व हक्कज्ञापानासाठी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांना दावा समन्सची बजावणी झाल्यानंतर ते दिनांक १८/०६/२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले. त्यानंतर मे. न्यायालयाने प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांनी अभिलेखावर कैफियत व म्हणणे वेळेत दाखल न केल्यामुळे त्यांच्याविरूध्द दिनांक २४/०९/२०२४ रोजी कैफियत व म्हणणे नाहीचा आदेश पारीत केला. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०५/११/२०२४ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रस्तुत प्रतिवादी यांची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांची कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. प्रतिवादी यांचे अर्जातील कथनावर अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. परंतु प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१)** प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांचा अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ ते ८ व १० यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत व म्हणणे अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2024.11.07 12:02:38 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ०५/११/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज